आपल्या विश्वासाचा १० वर्षांचा साथी...
लाडक्या लेकीचा ब्रँडेड बस्ता फक्त
ओम इलेक्ट्रॉनिक्स् मध्ये
असंख्य व्हरायटीमधून निवडा...
आपली मनपसंत वस्तू तेही
0% व्याज दरात
अधिक माहितीसाठी संपर्क
नगर-मनमाड हायवे, राहुरी फॅक्टरी । संपर्क : ७७६७०५७८७८
पोस्ट ऑफीसजवळ, राहुरी । संपर्क : ८०१३७७७८७८
२१ डिसेंबर २५

सायं. दैनिक

# सार्वमंथन

नवी दिशा, नवी आशा

मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२

इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in

0% व्याज दरावर
घरगुती उपकरणे
उधार पाहीजे, मग या ना!
BAJAJ FINSERV
। एसी । कुलर
। डिप फ्रीज
श्री बालाजी
इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड मोबाईल
बालाजी मंदिर रोड, ता. राहुरी, मो. ९८९०६७८९०३
आवश्यक लागणारे कागदपत्रे : आधार कार्ड, पॅन कॉर्ड, बँक पासबुक, डेबीट कार्ड
१८ ऑक्टोबर

। अहिल्यानगर । वर्ष ४ थे । अंक ९५३ वा । शनिवार, १७ मे २०२५ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।

फुल टाइम. पार्ट टाइम. एनी टाइम !
कमवा, शिका आणि प्रगती करा
भारताच्या सर्वात मोठ्या आयुर्विमा कंपनी बरोबर.
विमा सखी भरती अभियान
• पात्रता - 18 वर्ष पूर्ण • शिक्षण - किमान 10 वी/12 वी पास
घरातील जबाबदारी संभाळून कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी हातभार, 12 लाखांपर्यंत इन्शुरन्स, मेडिक्लेम, ग्रॅच्युटी इ. सरकारी नोकरीप्रमाणे सर्व फायदे मिळतील.
महिला करिअर प्रतिनिधी
(कमीशन व्यतिरिक्त मासिक मानधन)
प्रथम वर्ष 7,000/- मासिक मानधन + कमीशन
द्वितीय वर्ष 6,000/- मासिक मानधन + कमीशन
तृतीय वर्ष 5,000/- मासिक मानधन + कमीशन
उज्वल भविष्याची सुवर्णसंधी !
भारतीय आयुर्विमा महामंडळाची महिला करिअर प्रतिनिधी (विमा सखी) व्हा.
आणि मिळवा अमर्यादित उत्पन्नासह इतर अनेक फायदे मिळवा.
या संधीचा लाभ घेण्यासाठी आपल्या जवळच्या शाखा /सॅटेलाईट कार्यालयाशी संपर्क साधा.
• तुमच्या वेळेनुसार काम करा
• सर्वसमावेशक बेनिफिट पॅकेज
• मानसन्मान आणि प्रतिष्ठा
• फुल टाइम किंवा पार्ट टाइम करिअर...
रहिमान शेख,
9371726650

# अवकाळीचा मुक्काम वाढला!

- वादळ, विजांचा कडकडाट आणि पाऊस
- ५ दिवस मुसळधार,राज्यात अलर्ट जारी
- पुढील काही दिवस पावसाच्या सरी कायम

**सार्व मंथन**
**मुंबई १७ । वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा जोर वाढला असून शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. मराठवाड्यात गेल्या चार दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे उन्हाळी पीक आणि फळबागांचं मोठं नुकसान झाले आहे.राज्यात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवस मॉन्सूनच्या प्रगतीसाठी वातावरण अनुकूल राहणार आहे. त्यामुळे नैर्ऋत्य मोसमी वारे दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, कोमोरिन, अंदमान आणि मध्य बंगालच्या उपसागरात आणखी विस्तारण्याची शक्यता आहे. पूर्वमोसमी पावसामुळे राज्यात तापमानात घट झाली आहे. त्यामुळे हवामान विभागाने राज्यातील अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट', तर विदर्भातील काही जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. यामुळे हवामानात बदल जाणवत असून वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

शनिवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव वगळता मध्य महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव आणि विदर्भातील अनेक भागांत विजांसह पावसाचा अंदाज आहे. चंद्रपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांना 'ऑरेंज अलर्ट', तर इतर जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, पुढील तीन दिवसांत ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, नंदुरबार वगळता अन्य जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रभावी भाषण शिका...
अहिल्यानगर आणि राहुरी स्पेशल बॅचेस सुरू
खुशखबर! खुशखबर!! खुशखबर!!
राहुरी स्पेशल बॅच
१७ मे पासून सुरू
एकूण पाच शनिवार
* वेळ : दुपारी १ ते ५
भाषण न जमल्यास दुप्पट फी परत
संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक संघ ट्रेनिंग हॉल (योगा केंद्र),
अशोक कुशन शेजारी, गोकुळ कॉलनी, राहुरी. संपर्क : ७९७२४७२६९०, ७०३०४५१३३३



# तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीत विखे, कर्डिले, पाटील, कदमांचा कोणाला छुपा पाठिंबा?

**सार्व मंथन**
**राहुरी १७ । विशेष प्रतिनिधी**

डॉ. तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीमध्ये विखे पाटील व जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले, सुभाष पाटील यांच्यासह भाजपचे सत्यजित कदम, तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन उदयसिंह पाटील, नामदेव ढोकणे आदींनी कारखान्याच्या निवडणुकीकडे पाठ फिरवल्याने तालुक्यात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

विखे, कर्डिले, पाटील, ढोकणे, कदम या निवडणुकीमध्ये कोणाचे सारथी होणार व कोणाला मदत करणार? हे ही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

निवडणुकीमध्ये अरुण तनपुरे यांचे जनसेवा पॅनल, शेतकरी विकास मंडळाचे राजूभाऊ शेटे यांचा पॅनल, कारखाना बचाव कृती समितीचे अमृत धुमाळ, अरुण कडू, अजित कदम या तीन पॅनल पैकी वरील जेष्ठ मंडळी कोणाला आतून छुपा पाठिंबा देणार? याबाबत वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

विधानसभेला शेतकरी विकास मंडळाचे राजुभाऊ शेटे यांनी आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले आहे. यामध्ये अरुण तनपुरे यांचीही विखे-कर्डिले यांच्याबरोबर सलोख्याचे संबंध आहे.

कारखाना बचाव कृती समिती या निवडणुकीमध्ये आपणच कारखाना वाचवला अन्यथा त्याचा लिलाव झाला असता, हा मुद्दा उपस्थित करून निवडणुकीला सामोरे जाणार आहे. मात्र या तिन्ही पॅनलचे नेते निवडणुकीला सामोरे जाताना कोणता मुद्दा हायलाईट करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
* क्लासची वैशिष्ट्ये *
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कंम्प्युटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118
३० जानेवारी २५
२० फेब्रुवारी २५

# बियरबारमधून विदेशी दारू चोरणाऱ्या भामट्याच्या राहुरी पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**सार्व मंथन**
**राहुरी १७ । विशेष प्रतिनिधी**



बिड जिल्ह्यात सहा बियर बार व परमिट रुम मध्ये सहा लाख रुपयांची दारु चोरणाऱ्या आरोपीच्या राहुरी पोलीस पथकाने मुसक्या आवळून जेरबंद केले. तसेच त्याच्याकडून मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला.

या घटनेतील आरोपी दिपक अरुण चव्हाण, वय २८ वर्षे, रा. नेवासा फाटा, याने काही दिवसांपूर्वी बिड जिल्ह्यात सहा ठिकाणचे बियर बार व परमिट रुम मध्ये सहा लाख रुपए किंमतीचे ३५ विदेशी दारुचे बॉक्स चोरी केल्याची घटना घडली होती. या घटने बाबत बिड जिल्ह्यातील चकलंबा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर आरोपी चोरलेला मुद्देमाल घेऊन राहुरी येथे येत असल्याची खबर हवालदार सुरज गायकवाड यांना मिळाली. त्यानंतर पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस पथकाने सापळा लावून आरोपी दिपक चव्हाण याच्या मुसक्या आवळून जेरबंद केले. आरोपीने गुन्ह्याची गुन्ह्याची कबूली दिल्या नंतर त्याच्याकडून २ लाख रुपए किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

त्यानंतर सदर आरोपी व मुद्देमाल चकलांबा पोलीस ठाण्यातील तपासी अंमलदार पोलिस हवालदार रमेश भोले व हनुमंत इंगोले यांच्या ताब्यात घेण्यात आला.

पाहिजेत
सार्वमंथन न्युज महाराष्ट्र चॅनेलसाठी
अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यासह प्रत्येक तालुक्यात
न्युज रिपोर्टर व कॅमेरामन
जागा भरणे आहे. आकर्षक पगारासह इतर सुविधा दिल्या जातील. इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा.
दै. सार्व मंथन कार्यालय,
शिव चिंदबर कार्यालयाजवळ, बारागाव नांदुर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर. मो. 9822544072
NEWS NEWS

## राहुरी बाजार समिती कांदा आवक भाव

| | |
|---|---|
| आवक | २०००० |
| नं. १ कांदा | १००० ते १४०० |
| नं. २ कांदा | ५०० ते १००० |
| नं. ३ कांदा | १०० ते ५०० |
| गोल्टी | १०० ते ८०० |
| एक्स्ट्रा सुपर क्वॉलिटी | १४५० |

# १४ पोलीस अधीक्षकांना बदलीपर बढती

**सार्व मंथन**
**मुंबई १७ । वृत्तसंस्था**

राज्यातील १४ पोलीस अधीक्षकांना बदलीपर बढती देण्यात आली असून उप महानिरीक्षक पदावर त्यांची पदोन्नती करण्यात आली आहे.

त्यानुसार, नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांना अप्पर पोलीस आयुक्त मध्य प्रादेशिक विभाग मुंबई या ठिकाणी झाली नियुक्ती देण्यात आली आहे. तर, पुणे ग्रामीणच्या पंकज देशमुख यांना पुणे शहर अप्पर पोलीस आयुक्तपदी बढती देण्यात आली आहे.

आय.पी.एस.मोक्षदापाटील यांना राज्य राखीव पोलीस बल गटाच्या समादेशक पदावरुन पोलीस उपमहानिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

रत्नागिरीचे पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांना मुंबईच्या अप्पर पोलीस आयुक्त विशेष शाखा पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

पोलीस उप महानिरीक्षक" श्रेणीत पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या "पोलीस अधीक्षक" श्रेणीतील "निवडसूची-२०२५" मध्ये समाविष्ट, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद भा.पो. से. अधिकारी यांची, स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावरुन, स्तंभ (४) मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मधील तरतुदींनुसार, याद्वारे, पदस्थापना करण्यात येत आहे, असे म्हणत आय.पी.एस.अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

शासनाचे सचिव व्यंकटेश भट यांच्या सहीने ह्या पदोन्नती बदल्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, यासंदर्भातील शासन आदेश, आस्थापना मंडळ क्र.१ च्या शिफारशींचा यथायोग्य विचार करुन

पान २ वर

# ढाबा, हॉटेलात दारू प्याल तर मालकाला शिक्षा!

## हॉटेल, ढाबा मालकांचे धाबे दणाणले!

**सार्व मंथन**
**मुंबई १७ । वृत्तसंस्था**

ढाबा, हॉटेल, खानावळी आणि महामार्गावरील अनेक बीअर शॉपी, वाईन शॉप या ठिकाणी राजरोसपणे ग्राहकांना दारू पाजणाऱ्या मालकांची आता खैर नाही. परवाना नसताना दारू पाजणाऱ्या ढाबा मालकांवर आता ५० हजार रुपये दंड किंवा थेट ५ वर्षांची शिक्षा होणार आहे.

राज्यातील उत्पादन शुल्क विभागाने याप्रकरणी कारवाईचे चक्र सुरू केली असून "दारू परवाना नसेल तर मद्यपानास थारा नाही असा स्पष्ट संदेश दिला आहे.

अनेक ठिकाणी बीअर, वाईन शॉपच्या नावाखाली ढाब्यांमध्ये दारू विक्री व सेवन सुरू असून, काही ठिकाणी तर बनावट मद्यही ग्राहकांच्या ताटात वाढले जात आहे. यामुळे आरोग्याचा धोका तर आहेच, पण कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीनेही गंभीर परिणाम होतात. या गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रिय झाला आहे.

विभागाकडून कारवाया सुरू करण्यात आल्या असून, आता ढाबे मालकांनाच शिक्षा केली जाणार आहे. त्यामुळे आता ढाबा मालकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे आता ढाबा मालकांनी आपल्या परिसरात दारू सेवनास परवानगी देऊ नये, अन्यथा मे.न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ येईल. राज्य सरकारने निर्धारित परवानगीशिवाय मद्यपान रोखण्यासाठी कायदेशीर तरतुदींची अंमलबजावणी सुरू केली आहे.

त्यामुळे ढाब्यांमध्ये दारू प्यायची की खायचं, हे आता ग्राहक आणि मालकांनी ठरवावं लागणार आहे.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार?

## हायकोर्टात विशेष पूर्णपीठ स्थापन

**सार्व मंथन**
**मुंबई १७ । वृत्तसंस्था**




राज्यातील बहुचर्चित मराठा आरक्षणाच्या याचिकांवर आता लवकर सुनावणी होणार आहे. या प्रकरणाच्या कायदेशीर निकालासाठी नागरिकांचे लक्ष लागले असतानाच, मुंबई उच्च न्यायालयाने विशेष पूर्णपीठ स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता या प्रकरणाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे, संदीप मारणे आणि निजामुद्दीन जमादार यांचं विशेष पूर्णपीठ यासाठी नेमण्यात आलं आहे. याचिकांवरील सुनावणीसाठी हे पूर्णपीठ नेमून, याआधी अपूर्ण राहिलेल्या युक्तिवादांची प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या आणि समर्थन करणाऱ्या विविध याचिकांवर मागील काही वर्षांपासून सुनावणी सुरू होती. याआधी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठाने युक्तिवाद ऐकून घेतला होता. मात्र त्यांची बदली झाल्यानंतर सुनावणी अर्धवट राहिली.

आता पुन्हा नवीन पूर्णपीठ स्थापन झाल्यामुळे, सुनावणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्याची शक्यता

पान २ वर

## युध्द वेळे

काही नेते मंडळींना
युध्दाची झाली घाई
वाटे कसा पोरखेळ
संकटात देशास नेई

सर्वकष हवी तयारी
करण्याआधी लढाई
आंधळ्याद्वेषत्वेषात
नको उन्मादी बढाई

निसर्गाची साथसंगत
योजनांबध्द रे घडाई
भौगोलिक स्थितीची
काळजी पूर्वक पढाई

शस्त्रास्त्रेपारजून ठेवे
मगच सु योग्य चढाई
सैनिकी मनोबल वृध्दी
निर्णय नको आतताई

अन्यदेश हवेत सोबत
संबंधात नाही खटाई
मित्र मंडळी साथीदार
संकल्पा नको ढिलाई

भडकाउडता युध्दाचा
गगना भिडेल महागाई
आवश्यकतजवीजीने
व्यवस्था पूर्वक सगाई

सुयोग्यवेळ महत्वाची
जगत् हे देईलं बधाई
विजयश्री स्वता येईलं
वाजवी मधूर शहनाई

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# डॉ. तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीत तिरंगी लढत

## बंद पडलेल्या साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये ५६ उमेदवार उतरले निवडणुकीच्या रणांगणात

**सार्व मंथन**
**राहुरी १७ । विशेष प्रतिनिधी**




डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये बिनविरोध होण्याचे स्वप्न भंगल्याने तब्बल ५६ उमेदवारांनी निवडणुकीच्या आखाड्यात दंड थोपटले आहे.

२१ जागांसाठी ५६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले आहे. बंद पडलेल्या कारखान्यात सत्ता मिळवण्यासाठी अनेकांची रस्सीखेच दिसून आली तर निवडणूक बिनविरोध व्हावी असे अनेकांना वाटत होते मात्र अचानक कुठेतरी माशी शिंकली अन् निवडणूक लागली.

तर कारखान्यावर निवडून येण्यासाठी अनेक कारभारी कामाला लागले आहेत. कर्जाच्या खाईत गेलेला डॉ. तनपुरे कारखान्याचा कारभारी कोण होणार? तसेच आपणच या कारखान्याचे कारभारी होणार? असे अनेकांना स्वप्न पडू लागल्याचे दिसून येत आहे.

सुरुवातीस चौरंगी लढत होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला होता. यानंतर निवडणूक ही बिनविरोध होईल असाही तर्क लावला जात होता. अनेक नेत्यांनी बैठका घेऊन एकत्र येऊन साखर कारखान्याची निवडणुक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केला. मात्र सर्वांचे प्रयत्न अखेर फेल ठरले.

आता डॉ. तनपुरे कारखान्यात तिरंगी लढत फायनल झाली असून यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, राजुभाऊ शेटे यांचे शेतकरी विकास मंडळ तर कारखाना बचाव कृती समितीचे अमृत धुमाळ, अजित कदम व अरुण कडू यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगी लढत सुरू झाली आहे.

निवडणुकीच्या आखाड्यामध्ये उतरलेले उमेदवार : जनसेवा मंडळाचे उमेदवार - उत्पादक मतदार संघ : (कोल्हार गट) अशोक उर्हे, ज्ञानेश्वर कोळसे. (देवळाली प्रवरा गट) - अरुण ढुस, कृष्णा मुसमाडे, भारत वारुळे. (टाकळीमिया गट) -मीना करपे, ज्ञानेश्वर खुळे, ज्ञानेश्वर पवार. (आरडगाव गट) प्रमोद तारडे, वैशाली तारडे, सुनील मोरे. (वांबोरी गट) - किसन जवरे, भास्कर ढोकणे. (राहुरी गट) अरुण तनपुरे, जनार्दन गाडे, तसेच हर्ष अरुण तनपुरे (ब वर्ग, सहकारी संस्था), अरुण टोकळे (अनुसूचित जाती, जमाती), सपना प्रकाश भुजाडी, जनाबाई सोनवणे (महिला प्रतिनिधी), रावसाहेब तनपुरे (इतर मागासवर्ग),

पान २ वर

सायं. दैनिक **सार्वमंथन** नवी दिशा, नवी आशा





## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# जातीचा चष्मा !

देशाला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष उलटली आहे. जग तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भरारी घेत असताना भारतात मात्र जातीयता कमालीची वाढली आहे. ऑपरेशन सिंदूर भारतीयासाठी अभिमानाचा विषय आहे. त्या संघर्षाच्या चार दिवसांत कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी ज्या प्रकारे भारताची भूमिका देशासमोर आणि जगासमोर मांडली त्यामुळे त्या भारतातील प्रत्येक कुटुंबातील सदस्य झाल्या.प्रत्येक पित्याला आणि आईला आपल्या या मुलींचा अभिमान वाटला. देश म्हणून भारतातील सौहार्दाचे आणि धर्मनिरपेक्षतेच्या त्या प्रतिक ठरल्या. त्यांची घरातील छोट्या पडद्यावरील उपस्थिती भारतीयांना आपल्यातील कथित वेगळेपण विसरून भारत म्हणून १४० कोटी जणांचा विचार करायला प्रवृत्त करण्यासाठी पुरेशी ठरली.असे असूनही राजकारण्यांनी यात घाण केली आणि विष कालवण्याचाच प्रयत्न केला. एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारले असा अत्यंत लाजीरवाणा आणि किळसवाणा प्रकार गेल्या काही दिवसांत घडला. याची सुरूवात मध्य प्रदेशातील विजय शहा नावाच्या महाभाग मंत्र्यापासून झाली. त्यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्या संदर्भात असे काही विधान केले की प्रत्यक्ष तोंडातून विशिष्ट शब्द न काढता त्यांना जे काही म्हणायचे होते ते सांगून गेले. शहांमुळे भारतीय जनता पार्टीची चौफेर कोंडी झाली. टीकेचा भडीमार झाला.एवढेच नाही तर मध्य प्रदेश उच्च न्यायालयानेही यात दखल घेतली. उद्याचा काही भरवसा नाही, सहा तासांच्या आत शहांच्या विरोधात एफआयआर दाखल करा असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिले. त्यांच्या राजीनाम्याची मागणी झाली. देशभरात निदर्शनेही सुरू आहेत. तरीही राज्यातील सरकारकडून किमान शुक्रवारपर्यंत त्यांच्यावर कोणती कारवाई केली गेली नव्हती. शहांनी केलेला उपद्व्याप कमी होता की काय उत्तर प्रदेशात रामगोपाल यादव यांनी पोपटपंची केली. त्यांनी सोफिया कुरेशींचा केवळ उल्लेख केला. मात्र जे शहांनी कुरेशींबाबत केले, तेच यादवांनी विंग कमांडर व्योमिका सिंग आणि एअर मार्शल ए. के. भारती यांच्या संदर्भात केले. यादव हे उत्तर प्रदेशच्या राजकारणातील बडे प्रस्थ आहेत. माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्या कुटुंबातील आणि खास मर्जितील आहेत. समाजवादी पक्षातील कोणी रामजीलाल सुमन किंवा कोणी अबू आझमी यांनी काहीतरी बरळणे वेगळे आणि रामगोपाल यादव यांनी बरळणे वेगळे. विजय शहांमुळे बॅकफूटवर गेलेल्या भारतीय जनता पार्टीला यादवांच्या विधानाने संजिवनीच मिळाली आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह सर्वच भाजप नेते यादव यांच्यावर तुटुन पडले.अर्थातच यादव यांनी सारवासारव केली आहे. तथापि, त्यांच्यासारख्या जाणत्या नेत्याने मुळात असे विधान करणेच सर्वथा चुकीचे. तसेच त्यांचा अनुभव आणि राजकीय शहाणपण पाहता त्यांनी सहजपणे अथवा भाबडेपणाने अथवा आवाका नसल्यामुळे काहीतरी विधान ठोकून दिले असेही मानायचे कारण नाही. हे एका सुनियोजित रणनीतीचा भाग असण्याचीच दाट शक्यता आहे. तसे जर असेल तर आता भारतीयांनी अशा राजकारण्यांपासून विशेष सावध राहणेच गरजेचे.त्याचे कारण त्यांच्या राजकीय लाभासाठी ही मंडळी कोणत्याही थराला जाऊन समाजात एकोपा राहताच कामा नये यासाठी सतत प्रयत्नशील असल्याचे दिसते. भारतीयांच्या आवडीची आणि श्रध्देची काही ठिकाणे आहेत. त्यातील एक क्रिडा क्षेत्र आणि त्यातही क्रिकेट, दुसरे मनोरंजन क्षेत्र म्हणजे चित्रपटसृष्टी आणि तिसरे भारतीय लष्कर. यातील लष्कराची विशेष आठवण विशिष्ट संघर्षाच्या वेळी जरी येत असली तरी इतर सर्वच वेळी भारतीयांना आपल्या लष्कराचा प्रचंड अभिमान आहे. कोणत्या नेत्याने त्यांची प्रशंसा करो अथवा न करो, भारतीयांचा लष्करावर विश्वास आहे, श्रध्दा आहे.क्रिकेट अथवा अन्य कोणता सामना पाहताना तेथे खेळणारा भारताचा प्रतिनिधी असतो व तसेच त्याच्याकडे पाहिले जाते, त्याच्यावर प्रेम केले जाते. तेथे त्याच्या जातीचा अथवा धर्माचा विचारही मनाला शिवत नाही. मनोरंजन क्षेत्राच्या संदर्भातही हाच नियम भारतीयांच्या अंगवळणी आहे. त्यांना आवडत्या कलाकाराची जात अथवा धर्म जाणून घेण्याची गरज भासत नाही. ज्यांच्या नावातून त्यांचा धर्मही जाहीर होतो आहे त्या कलाकारांवरही जगभरातील भारतीयांचे प्रेम आहे आणि त्यालाही चित्रपटसृष्टीच्या स्थापनेपासूनचा इतिहास आहे. अन्य दोन क्षेत्र किमान विरंगुळ्याची म्हणून एक वेळ कमी लेखता येतील. लष्कराच्या बाबतीत भारतीयांना असलेला अभिमान हा कशाशीही तुलना करता येण्यासारखा नाही. लष्करातील मंडळी देशवासियांच्या सुरक्षेसाठी २४ तास मृत्यूच्या छायेत जगत असतात. याची कल्पना असल्यामुळेच युध्दाच्या काळात किंवा शांततेच्या काळात लष्करातील प्रत्येक व्यक्तीबद्दल त्याच्या मातेबद्दल, पत्नीबद्दल आणि एकूणच त्यांच्या सगळ्याच कुटुंबाबत समाजात सर्वदा आदराचीच भावना दिसते.भारतीय लष्कराचा जो काही ज्ञात इतिहास आहे तोही पाहिला तर तेथे सगळे भारतीय म्हणूनच एकवटलेले दिसतात आणि परस्पराच्या खांद्याला खांदा लावून लढताना दिसतात. त्या जवानांची, अधिकाऱ्यांची जात शोधण्याचा किंवा धर्माबद्दल बोलण्याचा नतद्रष्टपणा कोणी करताच कामा नये. किंबहुना सर्वोच्च आदरस्थानी असलेल्या त्या भारतीयांबद्दल तर राजकीय नेत्यांनी आपली अक्कल पाजळूच नये. विजय यात्रा काढा, तिरंगा यात्रा काढा, जल्लोष करा आणखी काय हवे ते करा. सैनिकाच्या जातीत डोकावू नका आणि धर्माचे बोलू नका.कारण देश हाच त्याचा धर्म आहे. जात- धर्माच्या कुबड्यांची गरज तुम्हाला मते मिळवण्यासाठी आहे.

# श्रीरामपुरचा जग्गू इराणी गजाआड

## बनावट पोलीस अधिकारी असल्याचा करत होता बनाव; वृद्धास लुटले

**सार्व मंथन**
**श्रीरामपूर १७ । प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान युद्ध सुरू असल्याचं सांगत वयोवृद्ध नागरिकांची तपासणी करत, त्यांना लुबाडणाऱ्या एका सराईत भामट्याला शिर्डी पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. आरोपी जाकीर हुसेन युसूफ खान उर्फ 'जग्गू इरानी' (वय ३०, रा. श्रीरामपूर) याच्यावर विविध राज्यांमध्ये वीसपेक्षा अधिक गुन्हे दाखल असून तो पोलिसांना अनेक दिवसापासून हवा होता, अशी माहिती डीवायएसपी शिरीष वमने यांनी दिली.

शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी सध्या शहरात सक्रिय असल्याचे निर्दशनास आल्यानंतर पोलिसांनी सापळा रचला. त्यानुसार, जग्गू इरानी एका वयोवृद्धाला ''युद्ध सुरू आहे, तपासणी करावी लागेल'' असं सांगून त्यांची अंगठी आणि रोकड घेण्याचा प्रयत्न करत होता, याच वेळी पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडलं.

पोलिस तपासात उघड झालं की, जाकीर हुसेन हा अनेक वेळा स्वत:ला पोलीस अधिकारी, सीबीआय अधिकारी असल्याचं सांगून सामान्य नागरिकांना फसवायचा. त्याच्याकडे बनावट पोलीस ओळखपत्र सापडलं असून तो अत्यंत हुशारीने वयोवृद्ध, एकटे दुकट्या नागरिकांना लक्ष्य करत असे.

अटक कारवाई दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून नंबर नसलेली नवी कोरी पल्सर दुचाकी देखील जप्त केली आहे. या दुचाकीच्या वापरातून तो वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे करत तसेच ही दुचाकी चोरीची असल्याचं समोर आल असून शिर्डीत तो याच दुचाकीवरुन फिरताना पोलीसांनी त्याला ताब्यात घेतलय.

आरोपी जाकीर हुसेन युसूफ खान उर्फ जग्गू इरानी या नावाने तो गुन्हेगारी क्षेत्रात प्रचलित आहे. श्रीरामपुर येथिल हा राहणारा असून त्याच्याकडे विविध ओळखपत्र देखिल मिळून आले. याने विविध राज्यात फसवणुकीचे गुन्हे केले आहेत.



तो स्वत:ला केंद्रीय तपास यंत्रणांचा अधिकारी असल्याचं सांगायचा. शिर्डीमध्येही त्याने वयोवृद्धांचीफसवणूककरण्याचा प्रयत्न केल्याच समोर आलं असून शिर्डी पोलीसांनी त्याला वेळेवर कारवाई करत पकडलं. त्याच्याविरोधात आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शिर्डी पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि सुसूत्र नियोजनामुळे एक सराईत भामटा गजाआड गेला असून, नागरिकांनी अशा बनावट आणि भामट्यांपासून सावध राहावं, असं आवाहन पोलिसांकडून करण्यात आलं आहे.

# नेवासा बाजारपेठ झाली जलमय

## पहिल्याच पावसात साचले पाणी

**सार्व मंथन**
**नेवासा । प्रतिनिधी**



अवघ्या एका तासाच्या जोरदार पावसाने नेवासा शहरातील बाजारपेठ जलमय झाली. ड्रेनेज होल बंद, गटारी तुंबलेली आणि निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे बाजारपेठ व परिसरात पाणीच पाणी साचले. नागरिक आणि व्यापाऱ्यांचे प्रचंड हाल झाले असून, नगरपंचायतीच्या ढिसाळ नियोजनावर सवाल उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे, मागील वर्षीच नगरपंचायतीला मानसूनपूर्व कामांसंदर्भात पत्र देण्यात आले होते, मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे गटारीचे पाणी रस्त्यावर आले, मॅनहोल बंद असल्यामुळे निचरा होऊ शकला नाही आणि परिसरात दुर्गंधीचा त्रास निर्माण झाला.

बाजारपेठ व नगरपंचायत कार्यालय परिसरात मॅनहोल उघडा ठेवला की प्रचंड दुर्गंधी निर्माण होते, त्यामुळे तो कायम बंद ठेवण्यात येतो यामुळे पाणी रस्त्यावरच साचून राहते. नेवासा शहरात तयार केलेले बंद गटारी या तांत्रिकदृष्ट्या चुकीच्या आणि ठेकेदारांच्या भ्रष्टाचारा मुळे निकृष्ट आणि पाण्याचा उतार न पाहता केलेल्या आहेत

या परिस्थितीचे मुळ कारण म्हणजे नेवासा नगरपंचायतीतील प्रशासकीय अस्थिरता. मागील एक वर्षात सहा प्रभारी अधिकारी बदलले गेले असून, यामुळे नगरपंचायतीचे कामकाज पूर्णत: विस्कळीत झाले आहे.

अंबादास गुरसळ साहेब गेल्यानंतर काही काळ सोनाली म्हात्रे या प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी सुमारे तीन-चार महिने जबाबदारी सांभाळली. त्यानंतर प्रभारी अधिकाऱ्यांची मालिकाच सुरू झाली. राहुरीचे ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी एक महिना काम पाहिले, त्यानंतर श्रीरामपूरचे सोमनाथ जाधव यांनीही एक महिनाच जबाबदारी सांभाळली. शेवगावच्या विजया घाडगे यांनी केवळ पंधरा दिवस काम पाहिले, तर देवळालीचे विकास नवाळे हे फक्त आठवडाभरच राहिले. सध्या पाथर्डीचे संतोष लांडगे कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त आहेत.

# विजेच्या लोखंडी खांबाचा महिलेला बसला शॉक

**सार्व मंथन**
**कोपरगाव १७ । प्रतिनिधी**

कोपरगाव शहरात विद्युत वितरण विभागाचा अनागोंदी कारभार नागरिकांच्या जीवावर बेतत आहे.

अचानक गुरुवारी दुपारी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने विजेच्या खांबावर स्पार्किंग होऊन सदर खाबांमध्ये विद्युत प्रवाह सुरु झाला आणि तिथे जवळच शेंगदाणे फुटाण्याची हातगाडी लावलेली होती त्या हात गाडीमध्ये विजेचा करंट उतरल्याने त्या हातगाडीला संगीता नानासाहेब साटोटे यांचा स्पर्श होताच सदर महिलेला दूर फेकले गेले दैव बलवत्तर म्हणून सदरची महिला वाचली सदरचा हा खांब गुरुद्वारा रोड जवळील वाणी कॉम्प्लेक्स च्या कॉर्नर वर ओपन थेटरच्या रस्त्याला लागून असलेल्या खांबाला सदरचा करंट उतरला होता. त्यामुळे त्याच्या शेजारी असलेल्या शेंगदाणा फुटाण्याच्या हात गाडीवर विद्युत करंट उतरल्यामुळे त्या गाडीजवळ असलेल्या संगीता नानासाहेब साटोटे या महिलेला करंट लागल्यामुळे दूर फेकल्या गेल्या तेथील नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. महावितरणने कोपरगाव शहरातील अनेक उपनगरांमध्ये विजेचे खांब धोकादायक बनले असून विद्युत वाहक तारा मध्येच कट झाल्यामुळे त्याला दुसऱ्या तारेच्या साह्याने जॉईंट देण्यात आले आहे.

पान १ वरून          पान १ वरून

## १४ पोलीस अधीक्षकांना बदलीपर बढती

व महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२ न मध्ये नमूद सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात आला आहे. खालील १४ पोलीस अधीक्षकांना पदोन्नती १) प्रसाद अक्कानवरु, २) पंकज देशमुख३) अमोघ गावकर ४) जी. श्रीधर ५) मोक्षदा पाटील ६) राकेस कलासागर ७) प्रियंका नारनवरे ८) अरविंद साळवे ९) सुरेश कुमार मेंगडे १०) धनंजय कुलकर्णी ११) विजय मगर १२) राजेश बनसोडे १३) विक्रम देशमाने १४) राजेंद्र दाभाडे अशी बढती व बदली झालेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत.

## मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार?


आहे. जून महिन्यात नियमित न्यायालयीन कामकाज सुरू झाल्यानंतर या याचिकांवर सुनावणी होईल, अशी शक्यता आहे. अद्याप सुनावणीची नेमकी तारीख जाहीर झालेली नाही. राज्य सरकारने २०२४ मध्ये मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सरकारने आरक्षणासंबंधी विशेष कायदा तयार केला. या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं असून, त्यावर सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाच्या निकषावर आधारित युक्तिवाद सुरु आहेत. आता न्यायालय अंतिम निर्णय देईल की हा कायदा वैध आहे की नाही. मराठा आरक्षण हा राज्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मुद्दा आहे. या निर्णयामुळे मराठा समाजात समाधान आणि असमाधानाचे मिश्र वातावरण आहे. कोर्टाच्या अंतिम निर्णयावर समाजातील अनेक घटकांची नजर राहणार आहे. राज्यभरातील मराठा समाज आणि इतर घटक न्यायालयाच्या या सुनावणीकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. यामुळे न्यायालयाच्या या विशेष पूर्णपीठाकडून जलद निर्णयाची अपेक्षा आहे.

## डॉ. तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीत तिरंगी लढत

अशोक तमनर (भटक्या जाती-विमुक्त जमाती). शेतकरी विकास मंडळ - उत्पादक मतदारसंघ : (कोल्हार मच्छिंद्र कोळसे, गोरक्षनाथ गट) घाडगे. (देवळाली प्रवरा गट) गोरक्षनाथ चव्हाण, चंद्रकांत आढाव, गणेश मुसमाडे. (टाकळीमिया गट) पोपट पोटे, चंद्रकांत पवार, सुभाष जुंदरे. (आरडगाव गट) - मधुकर तारडे, तसेच रायभान काळे (ब वर्ग, सहकारी संस्था), नामदेव झारेकर (अनुसूचित जाती जमाती), कौशल्याबाई शेटे, लीलाबाई येवले (महिला प्रतिनिधी), सुरेश शिरसाठ (इतर मागासवर्ग), अण्णा विटनोर (भटक्या जाती विमुक्त जमाती). कारखाना बचाव कृती समिती - उत्पादक मतदारसंघ : (देवळाली प्रवरा गट) अप्पासाहेब ढुस, सुखदेव मुसमाडे, सोमनाथ वाकडे. (टाकळीमिया गट) सुधाकर शिंदे, संजय पोटे. (आरडगाव गट) अरुण डोंगरे, अनिल कल्हापुरे. (राहुरी गट) - अरुण गाडे, सुभाष डौले, तसेच हरिभाऊ खामकर (अनुसूचित जाती-जमाती), शैलजा धुमाळ, लताबाई पवार (महिला प्रतिनिधी), दिलीप इंगळे (इतर मागासवर्ग). अपक्ष उमेदवार - राधाकिसन येवले (राहुरी गट, उत्पादक मतदारसंघ) असे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून तिरंगी निवडणुकीमधील उमेदवार हि निवडणुक कोणत्या मुद्द्यावर लढवली जाणार हे येणाऱ्या काळात दिसून येणार आहे.

# टाकळीमिया येथील गुरुकुलचा १०० टक्के निकाल

**सार्व मंथन**
**टाकळीमिया १७ । प्रतिनिधी**



राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील गुरुकुल इंग्लिश मीडियम या शाळेचा निकाल १००

टक्के लागला असून शाळेने सलग सात वर्ष १०० टक्के निकालाची परंपरा राखली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून सन. २०२५ मध्ये परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी या शाळेचे ६४ विद्यार्थी बसले होते सर्व विद्यार्थी उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाले. २९ विद्यार्थी ८० टक्के गुणांच्या पुढे उत्तीर्ण झाले तर शास्त्र विषयात दोन विद्यार्थ्यांना ९९ टक्के गुण मिळाले आहेत. शाळेत रिद्धी सतीश करपे ही ९६.४० गुण मिळवून पहिली. साई संदीप कोळसे हा ९४.२० टक्के गुण मिळवून दुसरा तर श्रावणी प्रमोद सोनवणे ही ९२.२० तक्के गुण मिळवून तिसरी आली.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक जी एस चोथे, सचिव बी. एस. करपे यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशासाठी शाळेचे प्राचार्य आर. जे. लाटे, व्ही. सी. इघे, पी. व्ही. परदेशी, एन. बी. संत, डी. एस. अनाप, एस. पी. भांड, जी. बी. घाडगे या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## छोट्या जाहिराती

### मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आर्युवैदिक औषधाने बरा

आयुर्वेदिक औषध, मुळव्याध, रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास यावर रामबाण उपाय, तसेच मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे खडे औषधाने विरघळतात. पोट दुखणे, कंबर दुखणे, गुडघे दुखी यावर आयुर्वेदिक रामबाण औषध मिळेल. लघवीला जळजळ, नेहमीच्या इंजेक्शनपासून सुटका, ऑपरेशनची गरज नाही, खास दुर्मिळ वनस्पतीपासून बनविलेले औषध, एकदाच औषध घेतल्यानंतर आयुष्यभर त्रास नाही. त्वचारोग व सेक्स संबंधी आयुर्वेदिक औषध उपलब्ध. एकदाच भेटा द्या. वरील आजारापासून सुटका करा.

टीप : १००% कायमचा बरा होईल.
अशोकराव पालवे, वांजुळपोई, ता. राहुरी, मो. 9370504776 (०६ एप्रिल)

## वाचकांना सूचना

सायं. दै. सार्व मंथन या वृत्तपत्रातून जाहीराती व मजकूर यांची शहनिशा करूनच वाचकांनी व्यवहार करावा. जाहीरातीतील उत्पादनाच्या संदर्भात जाहीरातदाराने जे दावे करतात, त्याची सार्व मंथन वृत्तसमुह कोणतीही हमी घेत नाही.

मो. 9325822832 /9322937487

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 12.5.25
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 12.5.25

| | | | |
|---|---|---|---|
| 5 168 690 780 | 0 136 145 235 | 2 138 147 156 | 7 124 278 458 |
| दिनांक १३.५.२५ | | | |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 3 120 247 256 | 8 170 279 567 |
| दिनांक १४.५.२५ | | | |
| 7 124 278 458 | 2 237 390 679 | 4 130 239 356 | 9 360 450 469 |
| दिनांक १५.५.२५ | | | |
| 8 125 134 350 | 3 580 670 689 | 5 140 249 348 | 0 389 479 569 |
| दिनांक १६.५.२५ | | | |
| 9 270 360 450 | 4 149 158 257 | 6 259 358 457 | 1 290 380 470 |
| दिनांक १७.५.२५ | | | |
| 0 127 136 370 | 5 140 348 456 | 7 160 269 368 | 2 345 390 589 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 12.5.25
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Close

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 | 5 366 447 0 118 299 |
| 40 - 45 x 90 - 95 | 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 | 2 336 499 7 188 449 |
| 12 - 17 x 62 - 67 | 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP
56 X 45
67 X 34
12 X 23

विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587

मेष : आजच्या दिवशी सुखाची, प्रेमाची, आनंदाची अनुभूती घ्याल. जोडीदाराच्या आवडीनिवडीचा आदर करा. जोडीदाराला खूश ठेवण्याचा प्रयत्न करा.

वृषभ : आज काही शारीरिक, मानसिक अस्थैर्य जाणवेल. नको त्या गोष्टींमध्ये हस्तक्षेप करणे प्रकर्षाने टाळा. कोणावरही विसंबून न राहता आपली कामे आपणच करण्याचा प्रयत्न करा.

मिथुन : आजच्या सुंदर दिवसाचे योग्य पद्धतीने नियोजन करा व त्यानुसार त्याची अंमलबजावणी करा. आपल्या क्षेत्रात नावलौकिक प्राप्त कराल.

कर्क : आज घरातील मंडळींच्या सहकार्याने घरातील एखादे महत्त्वाचे काम पूर्ण कराल. आजचा दिवस आपल्या मर्जीने मनसोक्त व्यतीत कराल. आजचा दिवस आपणासाठी लाभदायक असेल.

सिंह : आपली काही स्वप्ने, इच्छा पूर्ण करण्यासाठी आज प्रयत्नशील राहाल. त्यादृष्टीने काही महत्त्वाचे पाऊल उचलाल. त्यात भावंड, मित्र परिवाराचे सहकार्य लाभेल.

कन्या : आजचा दिवस कुटुंबीयांमध्ये रममाण होण्याचा आहे. त्यांच्या आनंदात आज आपले सुख शोधण्याचा प्रयत्न करा. त्यांच्या इच्छा, आकांक्षांचा आदर करा.

तुळ : आजचा दिवस आपणासाठी अतिशय उत्तम असेल. एक सकारात्मक ऊर्जा, उत्साह यांचा आज आपण अनुभव घ्याल. आजच्या दिवसाचा सदुपयोग अवश्य करा.

वृश्चिक : आजचा दिवस आपणासाठी काहीसा कष्टप्रद जाऊ शकतो. काही वितंडवादाचे प्रसंग घडू शकतात. त्यामुळे असे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करा.

धनु : आजचा दिवस आपणासाठी लाभदायक असेल. इतक्या दिवसांपासून घेत असलेल्या अविरत मेहनतीची शुभ फळे आज मिळतील. आज सर्वांचे प्रेम व सहवास लाभेल.

मकर : आजचा दिवस कष्ट, मेहनत परिश्रमाचा असेल. कामाच्या व्यापामुळे काहीशी धावपळ, दगदग होईल. मात्र संघर्षातूनच यशाचा मार्ग सापडेल. त्यामुळे चिंता करू नका.

कुंभ : आज बऱ्याच दिवसानंतर काही घटना आपल्या इच्छेनुसार घडतील. काही इच्छा, अपेक्षांची पूर्ती आज संभवते. आपल्या सुखात, आनंदात इतरांनाही सामावून घ्याल.

मीन : आज काही अप्रिय व्यक्ती, प्रसंग समोर येऊ शकतात. मात्र स्थिर बुद्धीने व खंबीरपणे त्यांना सामोरे जा. दुखापत होऊ शकते. काळजी घ्या.

लग्न, व्यवसाय, शिक्षण, नोकरीत येणाऱ्या अडचणी, करिअर, कोणतेही काम करताना येणारे अपयश, कर्जबाजारी होणे, कोणतेही काम पूर्ण न होणे, वास्तू दोषामुळे येणाऱ्या अडचणी व अपयश, सतत घरात कलह होणे, अडकलेले पैसे, फसवणूक यावर १००% मार्गदर्शन मिळेल.
विवाहास अडचण असेल तर एकदा नक्की मार्गदर्शन घ्या.
ऑनलाईन मार्गदर्शन उपलब्ध

संपर्क - सौ. कांचन थिटे
ज्योतिष, अंक वास्तू शास्त्र प्रवीण, विवाह (M. S. ), वास्तू तज्ञ
तडवळे रोड, नवीन एस. टी. स्टँड जवळ, कोरेगाव, सातारा
वास्तू मार्गदर्शन, विना तोडफोड वास्तुदोष जाण्यासाठी अगदी छोट्या गोष्टी आणि सोप्या उपाय योजना
। १००% रिझल्ट । एकदा नक्की सल्ला घेऊन बघा ।

## थोडक्यात

### ओमप्रकाश लोढा यांचे निधन



सार्व मंथन ✍ सोनई १७ । येथील प्रगतशील शेतकरी ओमप्रकाश शंकरराव लोढा (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे. परेश, प्रीतेश व पीयूष लोढा यांचे ते वडील, तर स्मार्ट किड्स अकॅडमीच्या संस्थापक प्राचार्या सोनल लोढा यांचे ते सासरे होते.

### सुशिला भट्टड यांचे निधन



सार्व मंथन ✍ राहुरी १७ । राहुरी शहरातील सौ सुशीला नंदकिशोर भट्टड वय ६८ यांचे अल्पशा आजारात दुःखद निधन झाले आहे.त्यांचे पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, पुतणे आदि परिवार आहे. राहुरीतील ज्येष्ठ व्यापारी नंदकिशोर भट्टड यांच्या त्या पत्नी होत्या. या अचानक झालेल्या निधनाने अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

### प्रभू पांनसंबळ यांचे निधन



सार्व मंथन ✍ राहुरी फॉक्टरी १७ । राहुरी तालुका प्रतिनिधी राहुरी तालुक्यातील चिंचविहिरे येथील तनपुरे कारखान्याचे सेवानिवृत्त कर्मचारी प्रभू तुकाराम पानसंबळ वय ८५ यांचे वृद्धापकाळत दुःखद निधन झाले आहे. ते अत्यंत मनमिळाव व धार्मिक स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुले तीन मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### जिल्ह्यात ड्रोन, मानवरहित हवाई यंत्र उडवण्यास मनाई

सार्व मंथन ✍ अहिल्यानगर १७ । जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्ह्याच्या हद्दीत कोणत्याही व्यक्तीस ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई यंत्र चालवण्यास, उडविण्यास किंवा वापरण्यास मनाई आदेश जारी केले आहेत. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यावर कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल. हे आदेश ३ जुन २०२५ पर्यंत लागू राहणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### पाथर्डीत १८ मे ला तिरंगा पदयात्रा

सार्व मंथन ✍ पाथर्डी १७ । पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २७ भारतीय पर्यटकांच्या हत्येनंतर भारतीय लष्कराने यशस्वीरित्या राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' या प्रत्युत्तर कारवाईच्या समर्थनार्थ आणि लष्कराच्या शौर्याचा गौरव करण्यासाठी पाथर्डी येथे रविवार, दि. १८ मे रोजी भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेला सकाळी ८ वाजता वीर सावरकर मैदान, बाजरतळ पाथर्डी येथून सुरुवात होणार आहे.दहशतवाद्यांनी केलेल्या निर्दय हल्ल्याचा बदला घेत भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. या पराक्रमाच्या पार्श्वभूमीवर देशभरात तिरंगा पदयात्रांचे आयोजन करण्यात येत असून पाथर्डीतील राष्ट्रप्रेमी नागरिकांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या तिरंगा पदयात्रेत विविध सामाजिक संस्था, समविचारी संघटना, महिलासंघटना तसेच युवक-युवतींचा सहभाग असून, देशभक्तीपर गीते, घोषणा आणि हम सेना के साथ हैं, ऑपरेशन सिंदूर के साथ राष्ट्र असे बॅनर लावून देशभक्तीचा संदेश दिला जाणार आहे. पदयात्रेदरम्यान शहीद जवान स्मारकाला अभिवादन करत श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे.

# उपलब्ध झालेल्या पाण्याचा काटकसरीने उपयोग करा

## सौ. शालिनीताई विखे; लोणी, आडगांव पाझर तलाव जलपूजन



सार्व मंथन
लोणी १७ । प्रतिनिधी

निळवंडेचे आवर्तन उन्हाळ्यामध्ये देऊन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वांनाच मोठा दिलासा दिला आहे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून ऊस लागवडीला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ शालिनीताई विखे पाटील यांनी करतानाच निळवंड्यांचे पाणी शेवटच्या घटकाला देणे हाच मंत्री विखे पाटील यांचा ध्यास असल्याचेही त्यांनी सांगितले.

निळवंडे लाभक्षेत्रातील लोणी खुर्द येथील मापरवाडी,गाडगे मळा, निमशेवाडी आडगाव खुर्द तलाव या ठिकाणी आयोजित जलपूजन प्रसंगी विखे पाटील बोलत होत्या. यावेळी विविध संस्थांचे पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी, महिला उपस्थित होत्या.

सौ. विखे पाटील म्हणाल्या की, जिरायत भागाला निळवंडे चे पाणी देऊ हा शब्द दिला होता तो आता पूर्ण झाला आहे. पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी जिल्हा परिषत उपाध्यक्ष असताना बांधलेल्या पाझर तलावात आज जल पूजन करताना मोठा आनंद होत असल्याचे सांगत उपलब्ध पाण्याचे नियोजन काटकसरीने करा यावरती वेगवेगळ्या पिकाबरोबरच उसाचीही लागवड करा. ऊस उत्पादनातून वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान अवगत करून आपले उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न करावा.

पाणी आले म्हणून पाणी पिकाला भरपूर न देता काटकसरीने पाण्याचा वापर करा. अजूनही ज्या भागांमध्ये पाणी मिळाले नाही त्या भागालाही पाणी देण्याचा प्रयत्न डॉ. विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू आहे. आवर्तन काळामध्ये अनेक पाझर तलाव भरल्याने यांचा उपयोग या भागातील पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सुटणार सुटल्याने जनतेने मंत्री विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

### समाजरत्न पुरस्कार प्राप्त

# बाळकृष्ण महाराजांचा सन्मान

सार्व मंथन
शनिशिंगणापूर १७ । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथे बेंद वस्ती भूलोकीचे स्वर्ग श्री क्षेत्र देवगड येथील आदरणीय वंदनीय पूजनीय गुरुवर्य शांती ब्रह्म प्रातः स्मरणीय यांच्या हस्ते दत्त मूर्तीची प्रतिष्ठापनाझाली. त्यानंतर अमळनेर येथील वेदशास्त्र संपन्न राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्राप्त बालब्रह्मचारी ज्योतिष तज्ञ हनुमान भक्त बाल कृष्णजी महाराज यांचा शांती ब्रह्म भास्करगिरीजी महाराजांनी त्यांचा यथोचित सन्मान केला.



### तीन अल्पवयीन मुलींना पळवून अश्लील कृत्य करणाऱ्या

# राहुरीतील आरोपीस सक्त मजुरीची शिक्षा

## सक्त मजुरी सुनावलेला आरोपी राहुरी तालुक्यातील उंबरे येथील

सार्व मंथन
राहुरी १७ । विशेष प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील उंबरे येथे राहणा-या आरोपी नामे सोमनाथ उर्फ ऋषीकेश एकनाथ हापसे वय वय वर्ष ३२ याने चाईल्ड लाईन संस्थेचा कर्मचारी असल्याची बतावणी करुन तीन अल्पवयीन मुलींना पळवून त्यांचेशी अश्लील कृत्य केल्या प्रकरणी विशेष जिल्हा न्यायाधीश, श्रीमती माथुरी एच. मोरे यांनी आरोपीस बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणारा कायदा कलम ८ तसेच भा. द. वि. कलम ३६३,३६६, ३५४ अन्वये अन्वये दोषी धरून आरोपीस बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणारा कायदा कलम ८ नुसार चार वर्ष सक्त मजुरीची शिक्षा, रक्कम रुपये तीन हजार दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैद तसेच भा. द. वि. कलम ३६६ नुसार ३ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा तसेच दंड रु.३०००, दंड न भरल्यास एक महिना साथी कैद अशी शिक्षा ठोठावली. या प्रकरणी सदर खटल्याचे काम काज विशेष सरकारी वकील श्रीमती मनिषा पी. केळगंद्रे-शिंदे यांनी पाहिले.

दि. १३ सप्टेंबर २०२३ रोजी फिर्यादी हिने तिची अल्पवयीन लहान बहीण तसेच बहिणीच्या दोन अल्पवयीन मैत्रिणी या शाळेत जातो म्हणुन घरातुन बाहेर गेल्या त्या परत आल्या नाहीत म्हणुन तोफखाना पो.स्टे. ला अज्ञात इसमा विरुध्द अल्पवयीन मुलींना पळवून नेल्या प्रकरणी फिर्याद दिली. याबाबत तोफखाना पो.स्टे.ला भा.दं.वि. कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

### अहिल्यानगर एलसीबी पथकाकडून

# पाथर्डी येथील गांजा विक्रेत्यावर छापा

## आरोपीकडून १ किलो ३५८ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त



सार्व मंथन
अहिल्यानगर १७ । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशाने अवैध व्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई करण्यात आली आहे यामध्ये पाथर्डी येथे गांजा विक्री करणाऱ्या इसमास जेरबंद करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढुन त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत पोनि दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा यांना आदेश दिलेले आहेत.

पोनि दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोसई/राजेंद्र वाघ व पोलीस अंमलदार विश्वास बेरड, अतुल लोटके, संतोष खैरे, शिवाजी ढाकणे, भगवान थोरात व सारिका दरेकर अशाचे पथक नेमूण जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत सुचना व मार्गदर्शन करुन पथकास रवाना केले.

दि.१५ मे २०२५ रोजी पथक पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदयाची माहिती काढत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, इसम नामे सोमनाथ लक्ष्मण फतपुरे, रा.कोरडगाव रोड, पाथर्डी हा त्याचे राहते घरामध्ये अंमली पदार्थ गांजा विक्री करत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी, शेवगाव उपविभाग यांचे आदेशानुसार सपोनि/हेमंत थोरात, स्थानिक गुन्हे शाखा व वरील पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार लक्ष्मण पोटे व विनोद मासाळकर अशांचे संयुक्त पथक तयार केले.

पथक पंच व आवश्यक साधनासह माहितीप्रमाणे पाथर्डी ते कोरडगाव जाणारे रोडलगत जाऊन एका घरामधील इसमास पोलीस पथक व पंचाची ओळख सांगुन सोमनाथ लक्ष्मण फतपुरे, वय ४८, रा. रामगीरबाबा टेकडी, कोरडगाव रोड, पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर यास ताब्यात घेतले.पंचासमक्ष त्याचे घराची झडती घेतली असता घराम धुन एका पिशवीत असलेला २७,१६०/- रू किंमत त्यात १ किलो ३५८ ग्रॅम वजनाचा अंम ली पदार्थ गांजा जप्त करण्यात आलेला आहे.ताब्यातील आरोपीकडे मिळालेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस करता त्याने काहीएक माहिती सांगीतली नाही.ताब्यातील आरोपीविरूध्द पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५४१/२०२५ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) () (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ताब्यातील आरोपीस जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह पाथर्डी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, पोलीस उपधिक्षक, सुनिल पाटील शेवगाव उपविभाग यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## 'समाज कल्याण'चा निधी इतर खात्यात वर्ग करू नये जिल्हाध्यक्ष : केदारे

सार्व मंथन
अहिल्यानगर १७ । प्रतिनिधी



समाज कल्याण विभागाचा निधी हा मागासवर्गीय समाजाच्या विविध योजना राबवण्यासाठी व मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला असतो हा निधी इतर खात्यात वर्ग न करता हा संपूर्ण निधी विविध योजनात वाटप करण्यात यावा अशया मागणी साठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार व माधवराव गायकवाड, शांताराम कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे, राज्य कार्यकारणी सदस्य कैलास गांगर्डे, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, राज्य कार्यकारणी सदस्य शोभाताई कानडे, ज्ञानेश्वर मैसमाळे, गणेश गोरे आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला निधी हा देखील पूर्णपणे नसतो या वर्षातील बराच निधी गेल्या म हिन्यापासून इतर योजनेसाठी इतर विभागाकडे वळवण्यात आलेला आहे. समाज कल्याण मंत्री यांच्या प्रसारमाध्यमातील वक्तव्यावरून निदर्शनास आले आहे. त्यामुळे समाज कल्याण खात्यात अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनेवर त्यांचा विपरीत परिणाम होणार आहे तसेच समाज कल्याण मार्फत राबवण्यात येणाऱ्या सर्व योजनेवर त्याचा दुरुपयोगी परिणाम होणार असून समाज कल्याण खात्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिकणाऱ्या मुलांची बार्टीच्या मार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती, आश्रम शाळा निधी, विद्यार्थी प्रशिक्षण निधी तसेच मागासवर्गीयांचा विविध कर्ज योजना इत्यादींवर व मागासवर्गीय विभागाला म्हणजेच समाज कल्याण खात्याला निधी योग्य प्रमाणात दिला जात नाही व तोही वेळेवर मिळत नाही तरी मागासवर्गीय सम ाजावर होणारा अन्याय दूर करून निधीचे वितरण पूर्ववत समाज कल्याण विभागाला करण्यात यावे व अशा प्रकारे समाज कल्याण खात्याचा निधी इतर खात्यात वळवण्याच्या घटना पुढे होऊ न देता याची दक्षता घेण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

Shri. Swami Prasad Pratishthan
**Swa.Nandkumar Pawar English Medium School**
Deolali Pravara. Shrirampur Road, Tal-Rahuri
**Walk in Interview**
Applications are invited from well qualified, experienced deserving Candidates for our school.

| Subject | Post | Qualification |
|---|---|---|
| English | 2 | B.A./M.A. B.ed |
| Social Sciences | 3 | M.A. /B.A B.ed |
| Sport | 1 | B.P.ed |
| Mathematics | 2 | B.Sc/M.Sc B.ed |
| Accountant | 1 | B:Com/M.Com |

Contact- Deolali Pravara,
Ph.No-02426-260348,9527423963/9404327424
*Interview Date - 20/05/2025, Time-9.00 AM to 3.00 PM.

### बिहाणी विद्यामंदिरचा

# दहावीचा निकाल ९४.६३ टक्के

## अनूज शिरसाठ ९५.८० टक्के मिळवून विद्यालयात प्रथम

सार्व मंथन
राहुरी १७ । प्रतिनिधी



राहुरी शहरातील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेला यावर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९४.६३ टक्के निकालाची उज्ज्वल कामगिरी साधता आली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी परिश्रमांची शिदोरी सिद्ध करत शाळेची यशपरंपरा यंदाही अभिमानाने कायम ठेवली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. बिहानणी विद्यालयाच्या २६१ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता, त्यापैकी २४७ विद्यार्थी यशस्वी ठरले. त्यामध्ये ४३ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणीत, ७८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत तर ७९ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळवले.

शाळेतील अनुज प्रकाश शिरसाठ याने ९५.८० टक्के (४७६ गुण) मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. ऐश्वर्या निळकंठ मंडलिक हिने ९४.६० टक्के (४७० गुण) मि ळवत द्वितीय क्रमांक, तर ओम प्रसाद अडसुरे याने ९२.८० टक्के (४६१ गुण) मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या घवघवीत यशाचे श्रेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला, शिक्षकांच्या मार्गदर्शनाला तसेच शाळेच्या शैक्षणिक वातावरणाला जाते. शाळेच्या या यशस्वी वाटचालीबद्दल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. प्रभावतीताई सतीश बिहाणी, सचिव मनोज बिहाणी, सहसचिव अनुप बिहाणी, मुख्याध्यापक कैलास अनाप, उपमुख्याध्यापिका मंजिरी देशपांडे, पर्यवेक्षक आर. जे. पवार तसेच शिक्षक वर्गाने विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# खा. लंकेंच्या गाण्यांना ५५ मिलियन व्ह्यूज!

## इंस्टा, फेसबुक, युट्यूबवर विक्रमी चाहते

सार्व मंथन
पारनेर १७ । प्रतिनिधी



राज्याच्या राजकारणात अल्पावधीमध्ये विशेष स्थान निर्माण करणाऱ्या खासदार नीलेश लंके यांच्या विविध उपक्रमांवर आधारीत तयार करण्यात आलेल्या गाण्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून या गाण्यांना इंस्ट्राग्राम, फेसबुक तसेच युटयुब आदी पब्लिक डोमेनवर तब्बल ५५ मिलियन (५ कोटी ५० लाख) व्हयूज मिळाल्या असून तो विक्रम मानला जातो.

खा. नीलेश लंके यांनी विधानसभा निवडणूकीत यश संपादनकरण्यापूर्वीपासून त्यांचा राज्यभरात मोठा चाहता वर्ग असून अनेक गीतकार तसेच संगीतकारांनी त्यांच्या विविध उपक्रमांवर गीते तयार केली असून अनेक नामवंत गायकांनी ही गीते गायली आहेत. खा. लंके हे कोरोना संकटात देवदूत म्हणून संपूर्ण देशासमोर आले. त्यानंतर राज्यातच नव्हे तर देशाच्या विविध भागांमधून त्यांचे फॉलोअर्स वाढले. त्यामुळे लंके यांच्यावरील गाण्यांना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरातून पसंती मिळाली आहे.

**आता कॉलर ट्यूनही!**

राजकीय नेत्यांमध्ये सर्वाधिक व्हूज असलेली गाणी अशी नोंद पब्लिक डोमेनमध्ये झाली असून काही गाणी विविध मोबाईल कंपन्यांच्या कॉलर टयुनम ध्येही समाविष्ट झाली आहे. आता खा. लंके यांचे चाहते या गाण्यांची कॉलर ट्यूनही लाऊ शकतात.

**संपूर्ण टीमसाठी विशेष दिवस**

खा. लंके यांच्यावरील गाणी तसेच सोशल मीडियाचे समन्वयक म्हणून काम करणारे मनोज शिंदे यांनी खा. लंके यांच्या गाण्यांना सर्वाधिक व्हूज मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. लोकनेते नीलेश लंके यांच्यावर गाणी तयार करण्याची संधी मला मिळाली याचा मला अभिमान वाटतो, मी भाग्यवान आहे, आजचा दिवस माझ्यासाठी आणि आपल्या संपूर्ण टीमसाठी अत्यंत विशेष आहे. खा. लंके यांच्या लोकसेवेचा, त्यांच्या जडणघडीचा आणि जनतेशी असलेल्या घट्ट नात्याचा आरसा या गाण्यांमधून उमटतो आणि त्याचेच फलित म्हणून ही गाणी जनमानसात घर करत असल्याचेही शिंदे यांनी नमुद केले.

**वृत्तवाहिन्यांवरही खा. लंके यांना पसंती**

विधानसभा निवडणूकीमध्ये तब्बल ६० हजार मतांनी विजयी होउन जायंट किलर म्हणून नावारूपास आलेले खा. नीलेश लंके हे माध्यमप्रतिनिधींच्या गळयातील ताईत बनले आहेत. राजकीय क्षेत्रातील कोणताही विषय असो, खा. नीलेश लंके यांच्या प्रतिक्रियेसाठी माध्यम प्रतिनिधी त्यांचा तात्काळ शोध घेतात. कोरोना संकटानंतर खा. लंके यांची क्रेझ आणखीच वाढली. खा. शरद पवार व पवार कुटूंबियांशी अल्पावधीत जोडले गेलेले व्यक्तिमत्व म्हणून खा. लंके यांच्याकडे पाहिले जात असून त्यांनी घेतलेले अनेक निर्णय हे आजवर बातमीचा विषय ठरले आहेत.

FinOlex PIPES
घर बांधताय...!
नगर जिल्ह्यात सर्वात कमी दरात फिनोलेक्स मटेरियल!
तर मग चला, प्लंबिंग पी.व्हि.सी सॅनिटरी आणि टाईल्स करिता...
सुनिल सेल्स कॉर्पोरेशन
बारागाव नांदूर रोड, राहुरी, जि. अ.नगर
। प्रोप्रा. सुनिल भट्टड ९८२२ ४२८६९९ । विजय भट्टड ९८९०४३३४१०



शितल एअर कंडीशनर्स
डिप फ्रिज, वॉटर कुलर, ए.सी.
VOLTAS beko VOLTAS
शाखा १ खंडोबा मंदिराजवळ, नगर रोड, राहुरी
शाखा २ शिक्षक बँकेजवळ, बस स्टॅण्डसमोर, राहुरी
9822207817, 9822518840, 8380096002

## मंथन फटकारे

**संजय संसारे, राहुरी**
**मो. ९३७०९४८९११**

त्यामुळे 'त्यांची' अटक ठरलेली टळली:वृत्त

**– संजय राऊत यांच्या वायफळ बडबडीने उद्धव ठाकरे यांचा शिवसेना पक्ष संपला मात्र त्यांना आजही शहाणपण येत नाही हे आश्चर्य.**

रेशन कार्डधारकांनी ३१ मे पर्यंत केवायसी करून घ्यावी :तहसीलदार पाटील

**तहसीलदार साहेब दरवर्षी केवायसी केली जाते या माध्यमातून नागरिकांना निव्वळ त्रास देण्याचा तर उद्देश प्रशासनाचा नाही ना.**

खासदार लंकेने राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्याच्या कानशिलात लगावली :वृत्त

**लोकप्रतिनिधी या स्तरापर्यंत गेले याचा अर्थ गेंड्याची कातडी पांघरलेल्या अधिकाऱ्यांना विकास कामांचे काही देणे घेणे नसून फक्त मलिदा मिळण्यासाठी अधिकारी काम करतात का हा प्रश्न निर्माण होतो.**

तनपुरे कारखाना निवडणूक तिरंगी होणार :वृत्त

**कारखान्याच्या संलग्न असलेल्या शैक्षणिक संस्थांकरिता निवडणुकीचा आटापिटा सुरु तर नाही ना ?**

जंगली रमी ऑनलाइन जुगार विरोधात जन आंदोलनाची हाक: वृत्त

**प्रसिद्ध अभिनेते क्रिकेटपटूंना वापरून या खेळाने अनेकांचे आयुष्य बरबाद केले, या विरोधात घेतलेली भूमिका योग्य आहे.**

पतसंस्थेकडून ठेवीदारांची लाखोंची फसवणूक:वृत्त

**पतसंस्थांमध्ये घोटाळा झाल्याच्या अनेक घटना समोर असताना नागरिकांचे डोळे का उघडत नाही?**

# तोतया पोलीसाने वृद्धास लुटले

**सार्व मंथन संगमनेर १७ ।** आश्वी खुर्द (ता.संगमनेर) येथील गबाजी बाळाकृष्ण भोसले (वय ७३) वर्षे एका इसमाने तोतया पोलीस सांगत १० ग्रॉम सोन्यांची आंगठी घेऊन पसार झाला .सविस्तर वृत्त असे की गबाजी बाळाकृष्ण भोसले (वय ७३) नित्य नियमाने घरातुन सायकलवर हानुमानवाडी दाढ खुर्द येथे लक्ष्मीआई मंदिरात चालले होते.त्यावेळी कोगजे वस्ती ते न्याय डेअरी दरम्यान डांबरी रस्तायवर ३० ते ३५ वर्षे वयाचा अनओळखी युवकाने थांबण्यास सांगितेल की, मी पोलीस खात्याचा चेंकींग करणारा आहे. सध्या तणावाची परिस्थिती चालू आहे, तुम्ही तोंडाला मास्क का नाही लावला. तुमच्या खिशात काय काय आहे. ते संगळे दाखवा हातीतील अंगठी काढण्यास सांगितली व कांगढी माझ्या पिशवीत टाकली.

### उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांनी
# कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा : ना. विखे

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर १७ । प्रतिनिधी**

शेती अधिक शास्त्रशुद्ध, फायदेशीर व पर्यावरणपूरक बनावी यासाठी शेतकऱ्यांनी पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शेतीसाठी उपयुक्त माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन २०२५ –२६ खरीप हंगामपूर्व आढावा व नियोजन बैठकीत पालकमंत्री श्री. विखे पाटील बोलत होते. बैठकीस आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज



आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अहिल्यानगरचे अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सातत्याने मार्गदर्शन दिले जात आहे. हवामानातील बदल, जमिनीची गुणवत्ता, योग्य पीक निवड, सिंचन पद्धती, खतांचे प्रमाण या बाबींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी यासाठी योजनांची पुस्तिका प्रकाशित करावी. योजनांची माहिती समाजमाध्यमांद्वारेही द्यावी.

तालुकास्तरावर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगामपूर्व बैठकांचे आयोजन करून या बैठकीत तालुक्यातील आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान करावा.

### कोतवाली पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रताप
# दराडे यांच्यावर मुख्यमंत्र्यांकडून कौतुकांची थाप
## महाराष्ट्र शासनाचा १०० दिवसांचा सुधारणा कार्यक्रम, नाशिक विभागात द्वितीय क्रमांक

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर १७ । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात पोलीस विभागात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल अहिल्यानगर येथील कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना नाशिक विभागात द्वितीय क्रमांक जाहीर करण्यात आला आहे.





१०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर कोतवाली पोलीस ठाण्याचे कर्तव्य पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी उल्लेखनीय काम केल्याबद्दल राज्य शासनाने नाशिक विभागात द्वितीय क्रमांक जाहीर केला आहे.

याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी प्रताप दराडे यांचे अभिनंदन केले आहे. तर अहिल्यानगर शहरचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी प्रताप दराडे यांचा सन्मान केला. यावेळी कोतवाली पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या जनावरांचे तीन टेम्पो
# सोनई पोलिसांनी राहुरी रोडवर पकडले
## नऊ लाख पाच हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**सार्व मंथन**
**शनिशिंगणापूर १७ । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील सोनई येथे राहुरी रोडवरील कॉलेज जवळ तीन पिक अप जनावरांना कत्तलीसाठी नेत असताना पकडले आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी दि. १४ रोजी दुपारी १२.१५ वाजण्याच्या सुमारास रोडवर एम एच ०९ सिसी ५८८८ व एम एच ०९ ईएम ३७७६ तसेच एम एच ०४ एच एस ००६२ क्रमांक असलेले तीन पिअप व त्यामध्ये विविध जातीचे जनावरे कृरतेने डांबुन कत्तलीसाठी नेत असताना पकडले. त्यामध्ये एकुण एक लाख ऐंशी हजार रुपयांचे जनावरे व सात लाख पंचवीस हजार रुपये किंमतीचे पिक अप असा एकुण नऊ लाख पाच हजार रुपये किंमतीचा मुद्दे माल जप्त करण्यात आला आहे.

सोमनाथ सुभाष हरेल रा. ब्राम्हणी यांनी सिद्धेश्वर मच्छिंद्र भावले, अशोक शहादेव बुधनर दोघे रा. खामगाव जिल्हा बिड, परमेश्वर महादेव कोटेकर रा. शिंगवेगाव, जिल्हा बिड, अर्जुन सर्जेराव सोलनकर, नितीन अर्जुन कोपनर, युवराज शिवाजी लगडे, रिजवानखान अयुबखान पठाण, सर्व रा. खामगाव जिल्हा बिड, हरिश्चंद्र दासराव हाके रा. माळेवाडी, अझरखान कुरेशी, सादिक अन्सार कुरेशी सर्व राहणार पिंपळनेर जिल्हा बिड यांचे विरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा र नं. १९२/२०२५ महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५(अ), ५(ब), चे उल्लघंन ९ तसेच प्रतिबध नियम ११ बिएनएस चे कलम ३(५) , मोटार अधिनियम कलम १९२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल बाळासाहेब बाचकर हे करत आहेत.

### जामखेड येथे स्वस्तात सोने देण्याचे आमीष दाखवून
# दरोडा टाकणारे ३ आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगरची कारवाई

**सार्व मंथन**
**अहिल्यानगर १७ । प्रतिनिधी**



स्वस्तात सोने देण्याचे आम्ही दाखवून लूटमार करणाऱ्या टोळीला अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने गजाआड केले आहे.

याबाबत सविस्तर हकिगत अशी की, यातील फिर्यादी राजेंद्र दिलीप मैड, वय ३५,रा.आश्वी, ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर यास महिला आरोपी नामे अश्विनी हिने फिर्यादीस १५० ग्रॅम सोने १० लाख रूपये असे स्वस्तात देण्याचे आमीष दाखवून दिनांक १४/०५/२०२५ रोजी फिर्यादीस कुसडगाव, ता.जामखेड येथे बोलविले. फिर्यादी पैसे घेऊन आल्यानंतर महिला आरोपी अश्विनी व तिचे ८ ते १० साथीदारांनी फिर्यादीस मारहाण करून त्यांचेकडील १० लाख रूपये रोख रक्कम, सोन्याचे दागीने व मोबाईल असा मुद्देमाल जबरीने चोरून नेला.याबाबत जामखेड पोलीस स्टेशन गुरनं २६६/२०२५ बीएनएस ३१० (२) प्रमाणे दरोडयाचा गुन्हा दाखल आहे.

दरोडयाच्या गुन्हयांची प्राथमिक माहिती मिळताच मा.पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस तात्काळ तपास पथके नेमून गुन्हयाचा तपास करणेबाबत आदेश दिले. त्यानुषंगाने पोनि/ दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोसई/ अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, गणेश लोंढे, रोहित मिसाळ, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, अमोल कोतकर, बाळासाहेब गुंजाळ, रमीजराजा आत्तार, विशाल तनपुरे, मनोज लातुरकर, सुनिल मालणकर,मेघराज कोल्हे, उमाकांत गावडे, अरूण मोरे अशांचे पथक गुन्हा उघडकिस आणणे बाबत आवश्यक सुचना देवुन पथकास रवाना केले.

दिनांक १५ मे २०२५ रोजी पथक जामखेड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गोपनीय व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना नमूद गुन्हा हा १) विकास काज्या काळे २) जरेणी विकास काळे दोन्ही रा.पोंदवडी, ता.करमाळा, जि.सोलापूर ३) वनिता रामचंद्र पवार, रा.सरदवाडी, ता.जामखेड ४) सोन्या शिवाजी काळे रा.सदफडोह, ता.करमाळा, जि.सोलापूर अशांनी त्यांचे साथीदारासह केला असून ते जवळा, ता.जामखेड येथे येणार असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने जवळा, ता.जामखेड येथे आरोपीतांचा शोध घेऊन १) सोन्या शिवाजी काळे, वय २८ २) अभित्या शिवाजी काळे, वय ३२, दोन्ही रा.सरफडोह, ता.करमाळा, जि.सोलापूर ३) शुभम रामचंद्र पवार, वय १८, रा.सरदवाडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर अशांना ताब्यात घेतले.

# तरुणास धारदार हत्याराने केली मारहाण

**सार्व मंथन**
**राहुरी १७ । प्रतिनिधी**

वारंवार फोन करुन पैसे का मागतो, असे म्हणुन आरोपींनी दोघा जणांना लाथा बूक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना राहुरी तालुक्यातील महाडुक सेंटर येथे दि. १२ मे रोजी सायंकाळच्या सुमारास घडली.

संदिप दिलीप बोरुडे, वय २७ वर्षे, रा. मालुंजे खुर्द, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १२ मे २०२५ रोजी रात्री ७.३० वाजे दरम्यान संदिप बोरुडे व त्यांचा मावस भाऊ महेश औटी हे महाडुक सेंटर येथे सरपंच केक शॉंपी समोर रोडवर उभे होते.

त्यावेळी तेथे आरोपी आले व म्हणाले की, तु गाईंचे पैसे शाम गायकवाड याला कशाला मागतो, तु शामला वारंवार फोन का लावतो? असे म्हणुन शिवीगाळ करुन इळा मारुन जखमी केले. तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन परत पैसे मागितले तर जीवे मारुन टाकीन, अशी धमकी दिली.

संदिप दिलीप बोरुडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी सागर नंदराम पवार, रा. माहेगाव, ता. राहुरी व शाम सुभाष गायकवाड, मच्छिंद्र रावसाहेब लोखंडे, शशिकांत लोखंडे, सर्व रा. महाडुक सेंटर, ता. राहुरी, या चार जणांवर गुन्हा रजि. नं. ५६४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

### शेतकऱ्यांच्या जमिनी आहे तशा ताब्यात दिल्याशिवाय
# निविदाधारकांना जमिनीवर पाय ठेवू देणार नाही
## शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांचा शेती महामंडळाला इशारा

**सार्व मंथन**
**श्रीरामपूर १७ । प्रतिनिधी**

दिनांक १६ मे २०२५रोजी सायंकाळी सहा वाजता शेती महामंडळ हरेगाव येथे आकारी पडित शेतकरी ,महामंडळाचे सहव्यवस्थापक सौ निर्मळ (उपजिल्हाधिकारी), पोलीस उपअधीक्षक बसवराज शिवपुजे व पोलीस निरीक्षक श्रीरामपूर शहर नितीन देशमुख यांची संयुक्त बैठक पार पडली.

१४ ऑगस्ट २०२४रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने आकारी पडितांच्या जमिनी आहे तशा आठ आठवड्याच्या आत देण्याचा निर्णय दिला आहे. त्यास जवळपास नऊ महिन्याचा कालावधी उलटला असून शासनाची आकारी पडितांना जमिनी देण्याची भूमिका स्पष्ट होत नसून उलट न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करून खाजगी धन दांडग्या, जवळच्या उद्योगपती लोकांना निविदा काढून कराराने जमिनी देण्याचा सपाटा चालू आहे.

हरेगाव मळा तीन वाडी येथील १२७ एकर जमीन रोहित आचार्य या व्यक्तीस निविदा पद्धतीने महामंडळांने दिली. सदर निविदा ही बेकायदेशीर असल्याने आकारी पडित शेतकऱ्यांनी त्या निवेदाधारकास कब्जा देण्यास विरोध केला. त्या अनुषंगाने सदर बैठक आयोजित केली होती. जवळपास दीड तास झालेल्या बैठकीत आकारीपडित शेतकऱ्यांच्या वतीने ॲड अजित काळे राज्य उपाध्यक्ष शेतकरी संघटना यांनी आकारी पडितांची व न्यायालयात झालेल्या निकालाची बाजू भक्कमपणे महामंडळाच्या अधिकाऱ्यांना पोलीस प्रशासनासमोर ठणकावून सांगितले की, आकारीपडित लाभधारक शेतकर्यांना न्याय दिल्याशिवाय एक गुंठा ही जमिनीत कोणालाही बेकायदेशीर कब्जा करू देणार नाही.

वास्तविक आज रोजी महामंडळाचे अस्तित्व संपले असून याबाबत आपण महामंडळाचे विसर्जन करण्यासाठी न्यायालयीन लढाई लढणार आहोत. महामंडळाला निविदा काढण्याचा आज कुठलाही अधिकार राहिलेला नाही. शेती महामंडळ हे आकारी पडितांना दबाव आणण्यासाठी बेकायदेशीर रित्या पोलीस बळाचा वापर करून निविदा धारकांना जमिनी देण्याचा घाट घालत आहे. अशा बेकायदेशीर कृतीला पोलीस प्रशासनाने संरक्षण देणे चुकीचे आहे.

सदर चर्चेदरम्यान शेती महामंडळाच्या उपजिल्हाधिकारी निर्मला यांनी आपण महसूलमंत्र्यांना अहवाल देणार असून लवकरच मंत्रालयात बैठक लावण्याचे आश्वासन शेती महामंडळाच्या अधिकारी यांनी आकारी पडित संघर्ष समितीच्या शेतकर्यांना दिले.

यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, सुदामराव औताडे, साहेबराव चोरमल, शरद आसने, सोपान नाईक, बाळासाहेब बकाल, बाबासाहेब वेताळ, सुनील आसने, बाळासाहेब आसने, ॲड सर्जेराव घोडे, संपतराव मुठे, सचिन वेताळ, अशोक दुधेडिया, छाजेडशेट, बबनराव नाईक सागर मुठे आदी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह आकारीपडित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायं. दैनिक सार्वमंथन नवी दिशा, नवी आशा
हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस ॲण्ड प्रिटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद–विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596